महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
**(CIN No. U40109MH2005SGC153646)**
**६ वा मजला,** प्रकाशगंगा , प्लॉट क्र.सी-१९, 'ई' ब्लॉक ,
बांद्रा-कुर्ला संकूल बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.
वेब साईट ः www.mahatransco.in

## १. कार्यकारी सारांश.

१.१ **पार्श्वभुमी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड(MSETCL महापारेषण ) ही महाराष्ट्र राज्याच्या संपूर्ण मालकीची आणि राज्यात सर्वत्र वीज पोहोचविण्याचे (पारेषण) कार्य करणारी समर्पित व उपयुक्त संस्था आहे. राज्यामध्ये विजेचे तिच्या उगम/निर्मिती स्त्रोत्रापासून वीज वापराच्या भार केंद्राच्या स्थांनापर्यत वीज पारेषणाची सुरळीत सोय करण्याच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी राज्यातील वीज पारेषण यंत्रणेचे नियोजन, विकास, संचालन आणि देखभाल करण्याची जबाबदारी या महापारेषण कंपनीवर आहे.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (MERC) यांच्या बहुवर्षीय वीज दर (Multi Year Tariff (MYT),२०११)नियमन यानुसार वित्तीय वर्ष २०१४-१५ च्या एकूण महसुलाची गरजा (Aggregate Revenue Requirement (ARR) यांचे समायोजन (True-up) करणे,आणि वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या एकूण महसूलाच्या गरजांचे हंगामी समायोजन, तसेच मा. म.वि.नि. आयोगाचे बहुवर्षीय वीज दर नियमने, वर्ष २०१५ यांच्याशी सुसंगत असे बहुवर्षीय तिस-या नियत्रंण कालावधीत म्हणजेच वित्तीय वर्ष २०१६-१७ ते वित्तीय वर्ष २०१९-२० यामध्ये कपंनीस लागणा-या एकूण महसूलाच्या आवश्यकतेचे प्रक्षेपण करणे व त्यासोबतच वित्तीय वर्ष २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ आणि २०१३-१४ या कालावधीसाठी जे भांडवलीकरण नामंजूर करण्यात आले होते त्यामुळे झालेले अनिष्ट परिणाम दर्शविणे या हेतुसाठी महापारेषण कंपनी हा विद्यमान विनंती अर्ज सादर करीत आहे.

या पूर्वी महापारेषणने वित्तीय वर्ष २०११-१२ या वर्षाच्या एकूण महसूलाच्या गरजांचे समायोजन करणे, वित्तीय वर्ष २०१२-१३ चा वार्षिक कार्यपालनाचा आढावा [Annual Performance Review (APR) ] सादर करणे आणि वित्तीय वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ या कालावधीचे बहुवर्षीय वीजदर निश्चित करणे यासाठी एक विनंती अर्ज सादर केला होता. त्यावर मा.म.वि.नि. आयोग यांनी प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ (चे) यात दि. १३ फेब्रुवारी २०१४ रोजी एक आदेश दिला.

मा. आयोगातील काही निर्देश (Directives) व त्यातील काही चुका यामुळे दुखावलेल्या महापारेषण कंपनीने त्यावर त्वरीत एक आढावा घेण्याचा विनंती अर्ज मा. आयोगाकडे केला व त्यासोबत एक शपथपत्र (Affidiavit) सादर केले या शपथपत्रात ज्या मुद्यांचा आढावा घेण्याची विनंती केली होती, त्यांच्या तपशीलाची यादी सादर केली होती. मा. आयोग यांनी महापारेषण कंपनीची विनंती वैध ठरविली आणि त्यांच्या प्रकरण क्र. ७९ वर्ष २०१४ दिनांक २४ जून २०१४ रोजी सदर वीजदराचा आढावा घेण्याचा आदेश दिला.

त्यानुसार मा. आयोग यांनी त्यांच्या स्वाधिकाराने (*suo moto* ) प्रकरण क्र. १२३ वर्ष २०१४ चे यात दि. १४ ऑगस्ट २०१४ रोजी राज्यांतर्गत वीज पारेषण दर आदेश दिला. त्याप्रमाणे महापारेषणच्या वित्तीय वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ या साठीच्या दरात सुधारणा केल्या. त्यातील पारेषणाच्या दराच्या हिशेबासंबंधीच्या काही समस्यांबाबत महापारेषण कंपनीने आढावा घेण्यासाठी विनंती अर्ज दाखला केला.

महापारेषणने मा. आयोगाकडे, दि. २८ नोव्हेंबर २०१४ रोजी वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या एकूण महसूलाच्या गरजेचे समायोजन, वित्तीय वर्ष २०१३-१४ चे हंगामी समायोजन व वित्तीय वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ यांच्या एकूण महसूलाच्या गरजांचे सुधारित अंदाज यांना मंजुरी देण्यासाठी विनंती अर्ज केला. मा. आयोगाने त्यातील काही त्रुटी व आणखी माहितीची गरजा या विषयी ते प्रकरण पून: महापारेषणकडे पाठविले त्यानंतर एक तांत्रिक वैधता सत्र दि. २४ डिसेंबर २०१४ रोजी आयोजित करण्यात आले. महापारेषणने मा. आयोगाने कळविलेल्या त्रुटी व मागवलेली जादा माहिती यावर आपले प्रतिसाद दि. १९, २२, २३ डिसेंबर २०१४ आणि ९ जानेवारी २०१५ रोजी सादर केले.

मा आयोगाने सदर विनंती अर्ज दि. १३ फेब्रुवारी २०१५ रोजी दाखल करुन घेतला. महापारेषण कंपनीने दि. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी या विनंती अर्जावर अभिप्राय/सूचना/हरकती मागविणारी जाहीर सूचना वितरीत केली.

या संबंधी जाहीर सुनावणी दि. ११ मार्च २०१४ रोजी आयोजिण्यात आली. मा. आयोगाने प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ चे यांत दि. २६ जून २०१५ रोजी आदेश दिला. या आदेशाच्या संदर्भात महापारेषणने एक आढावा घेण्याचा विनंती अर्ज (प्रकरण क्र. १०५ वर्ष २०१५ चे ) मा. आयोगाकडे सादर केला, जेणेकरुन वित्तीय वर्ष २०१२-१३ व वित्तीय वर्ष २०१३-१४ यांचे अंतिम समायोजन झाल्यानंतर, त्यातील परिणामांमुळे पडणारे महसुलतील फरक (अंतर), वित्तीय वर्ष २०१४-१५ चे हंगामी समायोजन (Provisional True up ) आणि वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या एकूण महसूलाचे गरजांचे सुधारीत अंदाज या सर्व बाबींचे योग्य रितीने पुन: निवेदन केले जाईल. महापारेषणने वीज संबंधीच्या अपिलासाठी असलेले मा. लवाद (न्यायाधिकरण) यांचेकडे एक अपील दि. ०७ ऑगस्ट २०१५ रोजी दाखल केले. (प्रकरण क्र. २४२ वर्ष २०१५) नंतर मा. आयोगाने आढाव्याच्या विनंती अर्जाचे प्रकरण क्र.१०५ यावर दि. २२ डिसेंबर २०१५ रोजी एक आदेश दिला.

महापारेषणला मा. आयोग यांचेकडून दि. ०९ सप्टेंबर २०१५ रोजी एक इ-मेल संदेश मिळाला. त्यांत मा. आयोगाच्या बहुविध वीजदराची नियमने २०१५ याच्या मसुद्यावर (Draft) जनतेकडून अभिप्राय/मते/हरकती/सूचना मागविण्याची सूचना केली होती.

त्यानंतर दि. ८ डिसेंबर २०१५ रोजी महापारेषण कंपनीकडे मा. आयोगाचा (आणखी)इ-मेल आला. त्यात बहुवर्षीय वीजदरावर विनंती अर्ज दि. १५ जानेवारी २०१६ पर्यत दाखल करण्याची सूचना केली होती.

त्यापुढे दि. १६ डिसेंबर २०१५ रोजी मा. आयोगाचा इ-मेल मिळाला. त्यात म.वि.नि. आयोगाचे बहुवर्षीय वीजदर यावर शासकीय राजपत्रात (Govt. Gazette) दिलेल्या अधिसूचनेसंबंधी माहिती कळविली होती. महापारेषणने दि. १७ सप्टेंबर २०१५ रोजी मा. आयोगाला बहुवर्षीय वीज दरां बाबत विनंती अर्ज सादर करण्याची मुदत वाढवून देण्याची विनंती केली त्यावर विनंती अर्ज सादर करण्याची मुदत दि. ३१ जानेवारी २०१६ पर्यत वाढविल्याचे इ-मेल व्दारे कळविले.

महापारेषणच्या बहुवर्षीय वीज दराविषयक विनंती अर्जाच्या मसुद्यावर म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी लिमिटेडच्या मंडळाच्या दि. २८ जानेवारी २०१६ च्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यात या विनंती अर्जाच्या मसुद्यात आणखी सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या बैठकीनंतर महापारेषणने मा. आयोगास पत्र देउन विनंती अर्ज सादर करण्याची मुदत दि. १५ फेब्रुवारी २०१६ पर्यत वाढविण्याची विनंती केली.

महापारेषणने दि. १० फेब्रुवारी २०१६ रोजी विनंती अर्ज सादर केला. यामध्ये वित्तीय वर्ष २०१४-१५ चे समायोजन, वित्तीय वर्ष २०१५-१६ चे हंगामी समायोजन आणि वित्तीय वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० यातील एकूण महसूलाच्या गरजा यांचा समावेश होता. याबाबत तांत्रिक वैधता सत्र (Technical Validation Session ) दि. ४ मार्च २०१६ रोजी आयोजिण्यात आले त्यानंतर महापारेषण मा. आयोगाकडे सुधारीत विनंती अर्ज सादर करीत आहे.

## १.२ विद्यमान विनंती अर्ज (The Present Petition) :

महापारेषणने या तात्काळ विनंती अर्जात वित्तीय वर्ष २०१४-१५ चे समायोजनाचा हिशोब सादर केला आहे हे समायोजन पुढे नेण्यात यावे. यासाठी कंपनीचे लेखा परिक्षित केलेल लेखे आणि मा. म.वि.नि. आयोग यांची (बहुवर्षीय वीज दर) नियमने २०११ यांत नमूद केलेली तत्वे यांचा आधार घेण्यात आलेला आहे. महापारेषणने विद्यमान विनंती अर्जात सादर केलेले वित्तीय वर्ष २०१४-१५ चे समायोजन या सोबत मागील काही वर्षातील नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाच्या मागण्या/दावे केले आहेत. आणि वित्तीय वर्ष २०१०-११ ते वित्तीय वर्ष २०१३-१४ आणि त्यानंतर नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाचे संबंधित परिणाम दर्शविले आहेत. त्यात घसा-यासाठीचा अग्रिम (AAD) समाविष्ट करुन झालेला घसारा, दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज, समभागावरील प्राप्ती (ROE ) आणि पारेषण यंत्रणा उपलब्धेतेसाठीची प्रोत्साहने या बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

महापारेषण वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या हंगामी समायोजनांचा हिशेब या विद्यमान विनंती अर्जात मांडला आहे. मा. म. वि. नि. आयोगाचे (बहुवर्षीय वीज दर ) नियमन यात दिलेल्या हंगामी लेखे व तत्वे यांच्या आधारे हे हंगामी समायोजन केले आहे.

यानंतर महापारेषणने विद्यमान विनंती अर्जात वित्तीय वर्ष २०१६-१७ ते वित्तीय वर्ष २०१९-२० ची एकूण महसूलाची आवश्यकता यांची मांडणी म.वि.नि. आयोग (बहुवर्षीय वीजदर ) नियमने २०१५ (MERC (MYT) Regulation २०१५) या मधील तरतुदींना अनुसरुन केलेली आहे. या विनंती अर्जाचे संक्षिप्त चित्र खालील विभागात दिले आहे.

### १.२.१ मागील काही वर्षात मत्तांचे भांडवलीकरण नामंजूर केल्याने झालेले अनिष्ट परिणाम :

वित्तीय वर्ष २०१०-११ ते वित्तीय वर्ष २०१३-१४ या कालावधीत मत्तांचे भांडवलीकरण नामंजूर केल्याने झालेल्या परिणामांचा हिशेब सादर केला आहे. या मध्ये या मत्तांच्या घसा-यांसाठी दिलेल्या अग्रिमांसह (AAD) घसारा, दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज, समभागावरील परतावे (Return on Equity (ROE) आणि पारेषण यंत्रणा उपलब्धतेची प्रोत्साहने यांचा समावेश आहे. या शिवाय भांडवलीकरण नामंजूर केल्यामुळे आणखी जादा झालेल्या परिणामांचाही हिशेब मांडला आहे. यामधे वित्तीय वर्ष २०१०-११ ते वित्तीय वर्ष २०१३-१४ या मध्ये मा. आयोगाने त्यांचा आदेश क्र. २०७ वर्ष २०१४ यात मंजूर केलेल्या रकमा आणि महापारेषणने मागणी केलेल्या घसारा, व्याज खर्च, समभागांचा परतावा (RoE) आणि पारेषणाची प्रोत्साहने यातील फरक दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १ : वित्तीय वर्ष २०१०-११ ते वित्तीय वर्ष २०१३-१४ या काळात भांडवलीकरण नामंजूर केल्याने झालेले परिणाम .**

(रु . कोटीत )

| तपशील | वित्तीय वर्ष २०१०-११ | वित्तीय वर्ष २०११-१२ | वित्तीय वर्ष २०१२-१३ | वित्तीय वर्ष २०१३-१४ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याजातील फरक | ०.८६ | २.३७ | ६.८८ | १४.५५ | २४.६७ |
| समभागावरील परतावा (ROE) यातील फरक | ०.३१ | ०.८२ | २.४४ | ५.३४ | ८.९१ |
| पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची प्रोत्साहने | ०.०२ | ०.११ | ०.१८ | ०.५४ | ०.८५ |
| घसारा (घसा-यासाठी दिलेल्या अग्रीमासह) | ०.०० | ३.३९ | ०.०० | ६.६८ | १०.०७ |
| **एकूण** | **१.१९** | **६.७०** | **९.५०** | **२७.११** | **४४.५०** |

### १.२.२ वित्तीय वर्ष २०१४ -१५ च्या एकूण महसूली गरजांचे समायोजन :

वित्तीय वर्ष २०१४-१५ च्या एकूण महसूल गरजांचे समायोजन करण्यासाठी महापारेषण कंपनीचे वित्तीय वर्ष २०१४-१५ चे लेखा परिक्षण केलेले वार्षिक अहवाल उपलब्ध असल्याने कंपनी आता वित्तीय वर्ष २०१४-१५ च्या एकूण महसूलाच्या गरजांचे समायोजन करण्याचा विनंती अर्ज सादर करीत आहे. या सारांशावरुन असे दिसून येईल की, दाखल केलेल्या विनंती अर्जातील एकूण महसूलाच्यां गरजा मा. आयोगाने प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ या मध्ये मंजूर केल्या पेक्षा कमी आहे, कारण वीज दराव्यतिरिक्त इतर उत्पन्न जास्त होते. तसेच या विनंती अर्जात एकूण महसूलाच्या गरजांच्या इतर शिर्षांची मागणी म्हणजे संचालन व सुव्यवस्थेचे खर्च, घसारा, व्याज खर्च यांची मागणीची आकडेवारी सुध्दा मा. आयोगाने मंजूर केलेल्या आकडेवारीपेक्षा कमी आहे.

**तक्ता क्र. २ : वित्तीय वर्ष २०१४-१५ च्या समायोजनाचा सारांश**

(रु . कोटीत )

| तपशील | प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ यातील मध्यावधी आदेशाप्रमाणे | प्रमाणांकानुसार (Normative) | विनंती अर्जातील (Petition) | प्राप्ती/(हानी) वाटून घेतल्यावर महापारेषणचा निव्वळ हक्क | समायोजनाची आवश्यकता |
|---|---|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च वेतन सुधारणा व भाडेपट्टी वरील सेवा कर या व्यतिरिक्त | १४५०.७८ | १४४९.५७ | १२४२.६१ | १३८०.५९ | (७०.१९) |
| वेतन सुधारणांचे परिणाम | | | ४२.०१ | ४२.०१ | ४२.०१ |
| भाडेपट्टीवरील सेवाकरांचे परिणाम | | | १.०६ | १.०६ | १.०६ |
| घसारा खर्च | ७८८.७६ | | ७७५.५० | ७७५.५० | (१३.२६) |
| भांडवली कर्जावरील व्याज | ७६३.५७ | | ७५९.०३ | ७५९.०३ | (४.५४) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| खेळते भांडवल व ग्राहकांची सुरक्षा अनामत यावर व्याज | ११२.८६ | ११२.६६ | २.५८ | ७५.९६ | (३६.९०) |
| इतर व्याज व वित आकार | १०.०४ | | १.९४ | १.९४ | (८.१०) |
| इतर खर्च | ६.१८ | | | | (६.१८) |
| आयकर | ५७७.४४ | | ६९२.६१ | ६९२.६१ | ११५.१७ |
| आकस्मिक राखीवमध्ये अंशदान | ४८.२० | | ४८.७२ | ४८.७२ | ०.५२ |
| **एकूण महसुली खर्च** | **३७५७.८३** | | **३५६६.०६** | **३७७७.४२** | **१९.५८** |
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | ७६१.४० | | ७६४.६६ | ७६४.६६ | ३.२६ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | **४५१९.२३** | | **४३३०.७२** | **४५४२.०८** | **२२.८५** |
| वजा: वीज दर बाह्य उत्पन्न | १९६.०२ | | २६९.७७ | २६९.७७ | ७३.७५ |
| वजा : गोवा, दादरा व नगर हवेली व इतर स्त्रोतांकडून व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न | ९०.१७ | | ६१.९१ | ६१.९१ | (२८.२६) |
| वजा : आंतर राज्य वीज तारांचे पी.ओ.सी.(PoC ) उत्पन्न | | | २०.०९ | २०.०९ | २०.०९ |
| **पारेषणा पासूनच्या एकूण महसुलाची गरज (ARR)** | **४२३३.०४** | | **३९७८.९५** | **४१९०.३१** | **(४२.७४)** |
| अधिक : एच.व्ही.ए.सी. प्रणालीच्या उपलब्धतेचे प्रोत्साहन | | | ५९.७३ | ५९.७३ | |
| अधिक :एच.व्ही.डी.सी. प्रणालीच्या उपलब्धतेचे प्रोत्साहन | | | १८.५५ | १८.५५ | |
| **पारेषणाच्या दरापासून महसूल** | | | **५०४४.१४** | **५०४४.१४** | |
| चालू वर्षातील महसुलातील फरक/ (अधिक्य) | | | (९८६.९२) | (७७५.५६) | |
| मागील काळात भांडवलीकरण नांमजूर केल्याने झालेले परिणाम | | | ४४.५० | ४४.५० | |
| मागील वर्षापर्यंतचा महसुलातील फरक /(अधिक्य) | | | (१७१.११) | (१७१.११) | |
| या वर्षापर्यंतचा महसुलातील संचित फरक /(अधिक्य) | | | (१११३.५३) | (९०२.१७) | |

**१.२.३ वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या एकूण महसूलाच्या गरजांचे हंगामी समायोजन :**

महापारेषण कंपनीचे, वित्तीय वर्ष २०१५-१६ मधील सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या सहामाहीचे (अर्धवार्षिक) हंगामी लेखे उपलब्ध असल्याने, महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या हंगामी अर्धवार्षिक समायोजनासाठी विनंती अर्ज सादर केला आहे. या सारांशावरुन असे दिसून येईल की, या विनंती अर्जात दाखल केलेली एकूण महसूल गरजा (ARR) या मा. आयोगाने प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ यात मंजूरी दिलेल्या 'एकूण महसूलाच्या गरजांपेक्षा कमी आहे, कारण वीज दर बाह्य उत्पन्न जास्त होते. तसेच इतर शीर्षे म्हणजे घसारा, खेळत्या भांडवलीवरील व्याज, आयकर या बाबींच्या विनंती अर्जातील मागण्याही मा. आयोगाने मंजूर केलेल्या आकडेवारीपेक्षा कमी आहेत.

**तक्ता क्र. ३ : वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या हंगामी समायोजनांचा सारांश**

(रु. कोटीत)

| **तपशील** | **प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ यातील मध्यावधी आदेशाप्रमाणे** | **प्रमाणांकानुसार (Normative)** | **विनंती अर्ज (Petition)** | **हंगामी समायोजन** |
|---|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च | १६०८.३५ | १६०६.८० | १४०५.७९ | (२०२.५६) |
| घसारा खर्च | ८७२.५४ | | ८६२.३७ | (१०.१७) |
| भांडवली कर्जाचे व्याज | ८११.८५ | | ७४०.१३ | (७१.७२) |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांच्या सुरक्षा अनामतीचे व्याज | ७३.६३ | ७३.६३ | ५८.१२ | (१५.५१) |
| इतर व्याज व वित आकार | १०.३८ | | ५.४६ | (४.९२) |
| इतर खर्च | ६.३१ | | | (६.३१) |
| आयकर | ४७.०५ | | २६.६२ | (२०.४३) |
| आकस्मिक राखीव मध्ये अंशदान | ५२.०८ | | ५२.०९ | ०.०१ |
| **एकूण महसुली खर्च** | **३४८२.१९** | | **३१५०.५७** | **(३३१.६२)** |
| अधिक : समभाग भांडवलाची प्राप्ती (RoE) | ८१०.११ | | ८१३.९१ | ३.८० |
| **एकूण महसुल आवश्यकता (ARR)** | **४२९२.३०** | | **३९६४.४८** | **(३२७.८२)** |
| वजा: वीज दर बाहय उत्पन्न | ६८१.०७ | | १६१.८१ | (५१९.२६) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वजा : गोवा, दादरा व नगर हवेली व इतर स्त्रोतांकडून व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न | ९०.१७ | | ६१.९१ | (२८.२६) |
| वजा : आंतर राज्य वीज तारांचे पी.ओ.सी.(PoC ) उत्पन्न | | | ५९.१० | ५९.१० |
| **पारेषण दरा पासून एकूण महसुलाची आवश्यकता** | **३५२१.०६** | | **३६८१.६६** | **१६०.६०** |
| **पारेषणाच्या दरापासून महसूल** | | | **३१५९.२६** | |
| चालू वर्षातील महसुलातील फरक/ (अधिक्य) | | | ५२२.४० | |
| मागील वर्षापर्यंतचा महसुलांतील फरक (अधिक्य) | | | (९०२.१७) | |
| म.वि.नि. आयोगाने प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ यात नामंजूर केलेले मागील वर्षातील भांडवली करणाचे परिणाम | | | ८२.५३ | |
| प्रकरण क्र. ७९ वर्ष २०१४ यातील आढावा आदेशामुळे जादा उपलब्धतेची प्रोत्साहने व समभागाचा सुधारीत प्राप्ती यावर झालेले परिणाम | | | १५.४८ | |
| कॅरींग कॉस्ट/(होल्डींग कॉस्ट) | | | ४७.१३ | |
| वर्षापर्यंत संचित महसूल फरक/(अधिक्य) | | | (२३४.६३) | |

**१.२.४ वित्तीय वर्ष २०१६-१७ ते वित्तीय वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी एकूण महसूलाच्या गरजा, महसूलातील अंतर (फरक) आणि पारेषण दरावर होणारे परिणाम.**

महापारेषण कंपनी म.वि.नि. आयोगाचे बहुवर्षीय नियमन २०१५ (MYT Regulations २०१५ ) यांतील तरतुदीशी सुसंगत असे वित्तीय वर्ष २०१६-१७ ते वित्तीय वर्ष २०१९-२० या कालावधीतील एकूण महसूलाची गरजा (ARR) निश्चित करण्याकरीता हा बहुवर्षीय वीज दराचा विनंती अर्ज दाखल करीत आहे.

तक्ता क्र. ४ : वित्तीय वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीसाठी प्रक्षेपित एकूण महसुलाच्या गरजांचा सारांश : (रु. कोटीत)

| तपशील | वित्तीय वर्ष २०१६-१७ | वित्तीय वर्ष २०१७-१८ | वित्तीय वर्ष २०१८-१९ | वित्तीय वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च | १४७६.०८ | १५४९.८८ | १६२७.३७ | १७०८.७४ |
| घसारा खर्च | ९६१.५४ | १०५३.४४ | ११३९.९४ | १२२४.२३ |
| भांडवली कर्जावरील व्याज | ७८६.६० | ८२९.५३ | ८५०.०४ | ८५७.९५ |
| खेळते भांडवल व ग्राहकाची सुरक्षा अनामतीवरील व्याज | ५८.१२ | ५८.१२ | ५८.१२ | ५८.१२ |
| इतर व्याज व वित्त आकार | ५.४६ | ५.४६ | ५.४६ | ५.४६ |
| आयकर | ९०.११ | ९५.९६ | २०९.७७ | २२१.१५ |
| आकस्मिक राखीवतेमध्ये अंशदान | ५६.६५ | ६१.४५ | ६५.५१ | ६९.६२ |
| **एकूण महसुली खर्च** | **३४३४.५६** | **३६५३.८३** | **३९५६.२१** | **४१४५.२७** |
| अधिक :समभाग भांडवलावर प्राप्ती | ४२२.२१ | ४४९.६३ | ९८२.९० | १०३६.२६ |
| **एकूण महसूलाची गरज (ARR)** | **३८५६.७७** | **४१०३.४६** | **४९३९.११** | **५१८१.५३** |
| वजा - वीज दर बाहय उत्पन्न | २२९.९७ | २३७.५७ | २४५.५६ | २५३.९७ |
| वजा- गोवा व दादरा- नगर हवेली आणि अन्य स्त्रोंताच्या व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न | ६१.९१ | ६१.९१ | ६१.९१ | ६१.९१ |
| व्जा -आंतरराज्य वीज तारांचे पी.ओ.सी. चे उत्पन्न | १७८.५५ | १७८.५५ | १७८.५५ | १७८.५५ |
| **पारेषण दरापासून एकत्रित महसूल गरज** | **३३८६.३४** | **३६२५.४३** | **४४५३.०९** | **४६८७.०९** |
| वित्तीय वर्ष-२०१५-१६ पर्यंत संचित महसूलात फरक(अंतर)/अधिक्य | (२३४.६३) | | | |
| **पारेषण दरापासून निव्वळ महसुल आवश्यकता** | **३१५१.७१** | | | |

**१.२.५ : वित्तीय वर्ष २०१६-१७ साठीच्या पारेषण दराचे परिणाम**

या विनंती अर्जात सादर केलेले महसूलातील अंतर-फरक (Gap)/अधिक्य (Surplus) यांच्या आधारे चालू वर्षातील विद्यमान पारेषण वीजदर रु. २२३.६६ कोटी प्रतिमाह आहे. त्यात वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये रु ३८.९८ कोटी प्रतिमाह अशी वाढ होईल. या विनंती अर्जात प्रस्तावित केलेल्या पारेषण दराच्या महसूल अधिक्याचा राज्यातील वीज वितरणाच्या परवानाधारक कंपन्यावर होणारा परिणाम पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ५ : वित्तीय वर्ष २०१६-१७ च्या पारेषण दराचे परिणाम**

(रु . कोटीत )

| **तपशील** | **अंशदान (%)टक्केवारी** | **महापारेषणच्या एकत्रित महसूल गरजा ए.आर. आर. मध्ये वीज वितरण कंपन्यांचे अंशदान (प्रकरण क्र.२०७ वर्ष २०१४ यांत मंजूर केल्याप्रमाणे)** | **महापारेषणच्या एकत्रित महसूल गरजांमध्ये वितरण कंपन्यांचे अंशदान/वाटा (चालू विनंती अर्जाच्या आधारे )** | **फरक** |
|---|---|---|---|---|
| महावितरण (MSEDCL) | ८३.०५% | २२२९.०१ | २६१७.५० | ३८८.४८ |
| टाटा पॉवर (वि) | ५.०१% | १३४.४७ | १५७.९० | २३.४४ |
| आर.इन्फ्रा (वि) | ७.३६% | १९७.५४ | २३१.९७ | ३४.४३ |
| बी.ई.एस.टी. | ४.५७% | १२२.६६ | १४४.०३ | २१.३८ |
| **एकूण** | **१००%** | **२६८३.९४** | **३१५१.७१** | **४६७.७७** |
| **महापारेषणच्या पारेषण दरातून प्रतिमाह वसूली** | | **२२३.६६** | **२६२.६४** | **३८.९८** |